# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६०९४७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in


क्र.संगाबाअवि-१३/५९/२०२३
दिनांक : १७.०४.२०२३

प्रति,
प्राचार्य/विभाग प्रमुख/प्रभारी अधिकारी,
सर्व संलग्नित महाविद्यालये/पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/
पद्व्युत्तर शैक्षणिक विभागांचे प्रशासकीय केंद्र,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**विषयः** **"समान संधी कक्ष (Equal Opportunity Cell), व्यवसाय समुपदेशन व मार्गदर्शन कक्ष (Career Councounselling & Guidence Cell), रोजगार कक्ष (Placement Cell), संगीत, कला आणि सांस्कृतिक कक्ष (Music, Arts & Cultural Cell) च्या बळकटीकरण करण्याकरीता करावयाची उपाययोजना व घ्यावयाचे कार्यक्रम/कार्यशाळा यांच्या कार्यपध्दतीचे निर्धारण." याबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**संदर्भः** विनियम क्रमांक २०/२०२२

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाव्दारे विनियम क्रमांक २०/२०२२ अन्वये **"समान संधी कक्ष (Equal Opportunity Cell), व्यवसाय समुपदेशन व मार्गदर्शन कक्ष (Career Councounselling & Guidence Cell), रोजगार कक्ष (Placement Cell), संगीत, कला आणि सांस्कृतिक कक्ष (Music, Arts & Cultural Cell) च्या बळकटीकरण करण्याकरीता करावयाची उपाययोजना व घ्यावयाचे कार्यक्रम/कार्यशाळा यांच्या कार्यपध्दतीचे निर्धारण."** प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

आपणांस विनंती करण्यात येते की, विनियम क्रमांक २०/२०२२ अन्वये आपले महाविद्यालयात कार्यवाही करण्यात यावी.

आपला विश्वासू,

**(डॉ.राजीव बोरकर)**
संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**सहपत्र** : विनियम क्रमांक २०/२०२२

# विनियम क्रमांक २०/२०२२

**" समान संधी कक्ष (Equal Opportunity Cell), व्यवसाय समुपदेशन व मार्गदर्शन कक्ष (Career Councounselling & Guidence Cell), रोजगार कक्ष (Placement Cell) संगीत, कला आणि सांस्कृतिक कक्ष (Music, Arts & Cultural Cell) च्या बळकटीकरण करण्याकरीता करावयाची उपाययोजना व घ्यावयाचे कार्यक्रम/कार्यशाळा यांच्या कार्यपध्दतीचे निर्धारण."**

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ५(४७)(ज) मधील अधिकार व कर्तव्याचे प्रावधानानुसार विद्यापीठाचे उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी आवश्यक व शक्य असेल असे सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणेच्यादृष्टीने आखण्यात आलेले कोणतेही इतर कार्यक्रम, सेवा किंवा उपक्रम यामध्ये सहभागी करण्याची तरतूद उपलब्ध आहे आणि;

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ५(३६) मधील अधिकार व कर्तव्याचे प्रावधानानुसार विद्यापीठ, महाविद्यालये, प्रशाळा व परिसंस्था यांच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत निरोगी वातावरण, समूह जीवन आणि सर्वसाधारण कल्याण यांच्या अभिवृध्दीसाठी व्यवस्था करणे अशी तरतूद विहीत करण्यात आलेली आहे आणि;

ज्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ५६ (१) नुसार विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकार व कर्तव्ये नमूद करण्यात आलेली आहेत आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतूद क्र ५६(१)(क) नुसार महाविद्यालये व विद्यापीठ विभाग यामधील सांस्कृतिक व विद्यार्थी विकास कार्यक्रमाच्या प्रचालनासाठी आवश्यक त्या उपाय योजना करणे अशी तरतूद विहीत करण्यात आलेली आहे आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतूद क्र ५६(१)(ख) नुसार विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या बाबतीत प्रादेशिक व राष्ट्रीय मंडळाशी दुवा साधनेआणि त्यांच्यासह विविध कार्यक्रमांचे एकत्रितरित्या प्रचालन करणे अशी तरतूद विहीत करण्यात आलेली आहे आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतूद क्र ५६(१)(ग) नुसार प्रायोगिक कला, केवल कला व रंग चित्रकला कौशल्ये या क्षेत्रातील आकलन होण्यासाठी अभिरुची व कौशल्ये यांच्या प्रोत्साहनाकरीता महाविद्यालये व विद्यापीठ विभांगामध्ये कार्यक्रम हाती घेणे अशी तरतूद विहीत करण्यात आलेली आहे आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतूद क्र ५६(१)(घ) नुसार महाविद्यालये, परिसंस्था आणि विद्यापीठ यांना समाजाच्या अधिक जवळ आणण्यासाठी विद्यापीठस्तरीय अशी तरतूद विहीत करण्यात आलेली आहे आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतूद क्र ५६(१)(झ) नुसार विविध प्रादेशिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरीय स्पर्धा आणि सांस्कृतिक, मनोरंजनात्मक व अन्य कार्यक्रम यामधील योग्य प्रशिक्षित संघांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक त्या उपाय योजना करणे अशी तरतूद विहीत करण्यात आलेली आहे आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतूद क्र ५६(१)(ञ) नुसार व्यवसाय समुपदेशन, मानसिकदृष्ट्या समुपदेशन आणि पुनर्वसन करण्यासाठी आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या (डिफरन्टली एबल स्टुडन्ट्स) उन्नतीसाठी योजना तयार करणे, विकसित करणे आणि राबविणे अशी तरतूद विहीत करण्यात आलेली आहे आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पंचवार्षिक बृहत आराखड्यामध्ये विद्यापीठाचा दर्जा उंचविण्याच्या दृष्टीने नमुद करण्यात आलेली विविध उद्दिष्टांच्या अंमलबजावणीसाठी कार्यबल गटाचे गठण करण्यात आले आहे. त्यानुषंगाने खालील बाबी विद्यार्थी विकास मंडळाव्दारे राबविण्यात यावे असे निर्देश दिले आहे आणि;

ज्याअर्थी, सदर योजना राबविण्याच्या दृष्टीकोनातून विनियमावली तयार करण्यात आली असून विद्यार्थी विकास मंडळ सभा दिनांक २७.१०.२०२१ रोजी संपन्न झालेल्या सभेमध्ये विषय क्रमांक ५१ नुसार प्रारुप विनियमावलीस मान्यता प्रदान करण्यात आली आणि;

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ३७(१) मधील (द) नुसार विनियम प्रारुपास व्यवस्थापन परिषदेस मान्यतेस सादर करण्याकरीता सर्वाधिकार अधिष्ठाता मंडळास बहाल करण्यात आले आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ७५ अंतर्गत व्यवस्थापन परीषद विनियम करतील अशी तरतूद आहे, आणि;

त्याअर्थी, व्यवस्थापन परीषद पुढील प्रमाणे विनियम विहित करतील :

०१. सदर विनियम **" समान संधी कक्ष (Equal Opportunity Cell), व्यवसाय समुपदेशन व मार्गदर्शन कक्ष (Career Councounselling & Guidence Cell), रोजगार कक्ष (Placement Cell) संगीत, कला आणि सांस्कृतिक कक्ष (Music, Arts & Cultural Cell) च्या बळकटीकरण करण्याकरीता करावयाची उपाययोजना व घ्यावयाचे कार्यक्रम/कार्यशाळा यांच्या कार्यपध्दतीचे निर्धारण."** विनियम – २०२२ असे संबोधण्यात येईल.

०२. व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या दिनांकापासून अंमलात यईल.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बृहत आराखडयामधील उपरोक्त कक्षांचे महाविद्यालयामध्ये गठण झाल्यानंतर त्यांच्या सक्षमिकरणाकरीता खालीलप्रकारे कार्यप्रणाली निर्धारीत करण्यात येत आहे.

१. संबंधित महाविद्यालयाच्या सदर कक्षांकरीता नेमलेल्या समन्वयकांच्या व प्रातिनिधीक स्वरुपातील विद्यार्थ्यांच्या जिल्हानिहाय कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात.

२. आयोजन करणाया महाविद्यालयाला सदर जिल्हास्तरीय कार्यशाळांच्या प्रस्ताव विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागात विहित नमुन्यात सादर करण्यात यावा.

३. सदर कार्यशाळेकरीता वक्त्यांचे मानधन व प्रवासखर्च, चहापान व जेवण, प्रमाणपत्र, फोटो इ. करीता एकत्रित खर्च **रु.१५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार फक्त)** विद्यापीठाद्वारे मंजुर करण्यात येईल. याव्यतिरिक्त होणाऱ्या खर्चाचे वहन आयोजक महाविद्यालयास करावे लागेल.

४. कोरोना/आपत्कालिन परिस्थितीमध्ये Ofline कार्यशाळांचे आयोजन शक्य न झाल्यास सदर कार्यशाळा Online माध्यमातून आयोजनाकरीता एकत्रित खर्च रु.५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजारफक्त) मंजूर करण्यात येईल. Online कार्यशाळांमध्ये वक्त्यांचे मानधन, Online Platform खर्च, ई-प्रमाणपत्र तसेच तांत्रिक बाबींकरीता सदर रक्कम खर्च करणे अपेक्षित आहे. तसेच सदर कार्यशाळेचे प्रसारण फेसबुक/युटयुब लाईव्ह करण्यात यावे.

५. सदर कार्यशाळांची कार्यक्रम पत्रिका ही विद्यार्थी विकास विभागाकडून मंजुर करणे आवश्यक राहील. तसेच कार्यशाळांच्या सहभागाच्या प्रमाणपत्रावर आयोजक महाविद्यालयातील विद्यार्थी विकास अधिकारी, प्राचार्य तथा संचालक, विद्यार्थी विकास यांच्या स्वाक्षरी असाव्या.

६. कार्यशाळा आयोजनानंतर दोन आठवडयाच्या आत विस्तृत अहवाल छायाचित्रासह व देयके प्राचार्यामार्फत प्रमाणित करुन विद्यार्थी विकास विभागाला सादर करावी.

७. या कार्यशाळेमध्ये प्रमुख वक्ता हे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयातील संबंधित विषयाचे ज्ञान असणारे प्राध्यापक किंवा अधिकारी किंवा विषयाचे तज्ञ व्यक्ति असावे.

८. सदर कार्यशाळेच्या उद्घाटनाला किंवा समारोपाला सन्माननीय कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, संचालक, विद्यार्थी विकास यांना शक्य असल्यास निमंत्रित करावे. तसेच त्या जिल्ह्यातील सन्माननीय अधिसभा सदस्य, व्यवस्थापन परिषद सदस्य, विद्यार्थी विकास मंडळाचे सदस्य यांना निमंत्रित करावे.

९. सदर कार्यशाळेचा खर्च संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अर्थसंकल्पातील विद्यार्थी विकास विभाग अंदाजपत्रकातील PERSPECTIVE PLAN मुख्य शिर्षातील (a) Equal Opportunity/ Placement/Cultural Club/E cell/Alumni Association Cell (i) Conduct of Activities/Workshop तसेच (b) Career Counseling/Students Development Cell, (i) Conduct of Activities/Workshop या उपशीर्षामधून करण्यात येईल.

१०. **अ) कक्षांकरीता नेमलेल्या समन्वयकांच्या कार्यशाळांची उद्दिष्टे ही खालीलप्रमाणे असतील.**
महाविद्यालयीन स्तरावर कक्ष बळकट करण्याच्या दृष्टिकोनातून सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल. सदर कार्यशाळेमध्ये कक्ष समन्वयक यांना वर्षभर कुठली जबाबदारी पार पाडावी लागेल कक्षाच्या अधीन राहून समन्वयकांनी या केंद्राचे संघटन कसे करायचे या संदर्भातील मार्गदर्शन सदर कार्यशाळेत करण्यात येईल.

**१) समान संधी कक्ष (Equal Opportunity Cell)**

अ) समान संधी कक्षाच्या माध्यमातून महाविद्यालयातील वंचित घटकातील विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना प्रोत्साहित करण्याच्या दृष्टिकोनातून कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करण्यात येईल.
ब) महाविद्यालयामध्ये दिव्यांग जणांना पुरविण्यात येणाया सोयी सुविधा तसेच क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम राबविणे संदर्भात मार्गदर्शन करण्यात येईल.

**२) व्यवसाय समुपदेशन व मार्गदर्शन कक्ष (Career Counseling & Guidance Cell)**

अ) सदर कार्यशाळेतून समन्वयकांना महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणामध्ये असलेली नोकरी-व्यवसायाच्या संधी बाबत मार्गदर्शन
ब) सदर कक्षांतर्गत विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येणारे कार्यशाळा/उपक्रम/कार्यक्रम आयोजित करण्या संदर्भात मार्गदर्शन

**३) रोजगार कक्ष (Placement Cell)**

अ) सदर कार्यशाळेतून समन्वयकांना महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी **Placement cell** यशस्वीपणे कार्यान्वित करण्यासंदर्भात मार्गदर्शन
ब) सदर कक्षांतर्गत विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येणारे कार्यशाळा/उपक्रम/ कार्यक्रम/ **Placement drive** आयोजित करण्यासंदर्भात मार्गदर्शन

**४) संगीत, कला आणि सांस्कृतिक कक्ष (Music, Arts & Cultural Cell)**

१. संगीत, कला आणि सांस्कृतिक केंद्राच्या माध्यमातून महाविद्यालयातील सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना प्रोत्साहित करण्याच्या दृष्टिकोनातून मार्गदर्शन कार्यशाळेमध्ये करण्यात येईल
२. संगीत, कला आणि सांस्कृतिक केंद्राच्या माध्यमातून जून महिन्यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना संगीत, नृत्य, नाट्य व इतरही ललित कलांच्या क्षेत्रात बळकटीकरण करण्याच्या दृष्टिकोनातून मार्गदर्शन करण्यात येईल.
३. विद्यापीठ, आंतरविद्यापीठ युवा महोत्सवाच्या दृष्टिकोनातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची चमू तयार करणेबाबत मार्गदर्शन करण्यात येईल.
४. आंतरमहाविद्यालयीन युवा महोत्सवाच्या महाविद्यालय चमूच्या प्रशिक्षणा संबंधीची व त्यांच्या तालीम संदर्भात मार्गदर्शन करण्यात येईल.
५. संगीत, कला आणि सांस्कृतिक केंद्र बळकटीकरण करण्याच्या दृष्टीने चालू शैक्षणिक वर्षात कुठले सांस्कृतिक कार्यक्रम महाविद्यालयात राबवावेत जेणेकरून विद्यार्थ्यांच्या कलेमध्ये अधिक भर पडेल त्याचे मार्गदर्शन करण्यात येईल.

**ब) प्रातिनिधीक स्वरुपातील विद्यार्थ्यांच्या जिल्हानिहाय कार्यशाळांची उद्दिष्टे ही खालीलप्रमाणे असतील.**

**अ) समान संधी कक्ष (Equal Opportunity Cell)**
१. महाविद्यालयात मोठ्या प्रमाणात समुदायाला समतेची आणि समान संधी मिळवून देण्यासाठी आणि सामाजिक समावेश मिळवून देण्यासाठी व तसा संदेश देण्यासाठी लाभदायी ठरेल.

२. अशा कार्य शाळेमधून किंवा व्याख्यानाच्या कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांमधील भेदभाव समजूत काढून टाकणे व शैक्षणिक सुसंवाद आणि विविध सामाजिक पार्श्वभूमीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांमधील निरोगी परस्पर संबंध वाढविण्यासाठी सामाजिकदृष्ट्या जन्मजात वातावरण निर्माण करण्याकरिता लाभदायी ठरेल.

३. समाजातील दुर्बल घटकांच्या तक्रारींचा शोध घेणे आणि त्यांच्या समस्यांवर शांततेने तोडगा काढणे तसेच सामाजिक दुर्बल घटकांच्या कल्याणकारी योजनांसाठी तसेच कार्यक्रमांशी संबंधित माहिती तसेच अधिसूचना / स्मरणपत्रे, शासनाचे कार्यालयीन आदेश किंवा इतर संबंधित एजन्सी / संघटना यांनी वेळोवेळी प्रसारित केलेल्या माहितीची ओळख होणे.

४. महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या क्रीडा व सांस्कृतिक उपजत गुणांना वाव देणे करिता अशा उपक्रमांचे आयोजन करणे.

५. दिव्यांग विद्यार्थ्यांमधील क्रीडा व संस्कृती संदर्भातील कलागुणांना वाव देण्याकरिता व भविष्यामध्ये संबंधित विषयात प्रगती करण्या करिता उपयुक्त ठरतील.

**क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमाचे आयोजन संदर्भात**

६. दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता विविध क्रीडा प्रकारांमधील काही क्रीडा प्रकारांवर स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. उदा. धावण्याची शर्यत, बुद्धिबळ व इतर.
७. दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता विविध सांस्कृतिक प्रकारांमधील काही सांस्कृतिक प्रकारांवर स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. उदा. गायन, नृत्य, नाटिका, वादविवाद, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा व इतर.
८. क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा संदर्भात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या क्रीडा स्पर्धा व युवा महोत्सव सांस्कृतिक स्पर्धातील नियमानुसार स्पर्धा आयोजन करण्यात यावेत.

**ब) व्यवसाय समुपदेशन व मार्गदर्शन कक्ष (Career Counseling & Guidance Cell)**
१. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये नोकरी व रोजगार संबंधी असणाऱ्या संधी यांची ओळख होणे व त्या दृष्टीने कौशल्य आत्मसात करण्याकरिता प्रयत्न करणे.
२. नोकरी वा व्यवसाय या संबंधी करावयाची पूर्वतयारी.
३. **MPSC/UPSC, NET/SET** चा अभ्यासक्रम तसेच परीक्षांची पूर्वतयारी करण्यासंदर्भात मार्गदर्शन.
४. कौशल्य विकास कार्यशाळा **(Soft Skills),** जीवन कौशल्य कार्यशाळा **(Life Skill)** च्या आयोजनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आमूलाग्र बदल घडून आणणे.

**क) रोजगार कक्ष (Placement Cell)**
१. रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करणे.
२. संबंधित कार्यशाळा, रोजगार निर्माण करणाऱ्या योजना आखणे.

**ड) संगीत, कला आणि सांस्कृतिक कक्ष (Music, Arts & Cultural Cell)**
०१. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव मधून निवड झालेले विद्यार्थी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व पुढील स्तरावर सातत्याने करीत आलेली आहे. या चमू मध्ये निवड होण्याच्या दृष्टिकोणातून ज्या कला प्रकारांमधून विद्यार्थी सहभागी झालेला आहे, त्या कला प्रकारांमध्ये त्यांचे कौशल्य योग्य पद्धतीने परीक्षकांच्या नजरेस घेण्याकरिता सदर कार्यशाळा अत्यंत उपयोगाची ठरेल.

०२. आंतरमहाविद्यालयीन युवा महोत्सवांमध्ये एकूण पाच कला प्रकारांच्या अंतर्गत २७ कला प्रकार सादर केल्या जातात. ज्यामध्ये संगीत, नृत्य, साहित्य, रंगमंचीय व ललित कला प्रकार यांचा सहभाग होतो. या ५ कलाप्रकाराअंतर्गत येणाया २७ कला प्रकारांची संपूर्ण माहिती सदर कार्यशाळेच्या माध्यमातून दिली जाईल.

०३. सदर कार्यशाळेचे आयोजन हे दोन गटांमध्ये विभाजीत करण्यात येईल. ज्याला आपण **अ** कार्यशाळा व **ब** कार्यशाळा असे संबोधण्यात येईल. **अ** गटामध्ये घेण्यात येणाया कार्यशाळेत संगीत व रंगमंचीय हे दोन मुख्य कलाप्रकार समाविष्ट करण्यात येईल व **ब** गटांमध्ये नृत्य, साहित्य व ललित कलाप्रकार समाविष्ट करण्यात येइल.

०४. सदर कार्यशाळा ही दोन सत्रांमध्ये विभाजित केल्या जाईल ज्यामध्ये पहिल्या सत्रात एका प्रकारातील संपूर्ण उपकला प्रकारांची माहिती व त्या अनुषंगाने करायची तयारी याबद्दल विस्तृतपणे मार्गदर्शन करण्यात येईल तसेच दुसया सत्रांमध्ये दुसऱ्या किंवा तिसऱ्या मुख्य कला प्रकाराची व त्याअंतर्गत येणाऱ्या उपकला प्रकारांची विस्तृत माहिती तसेच त्याअनुषंगाने करावयची तयारी याबद्दल विस्तृतपणे मार्गदर्शन करण्यात येईल.

*****